या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
94036 41482

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | बुधवार ३ जूले २०२४ | अंक२०६ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# नांदेड येथे ८-जुलै रोजी मराठा आरक्षण जनजागृती व शांतता रॅली



**नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट**
नांदेड : सगेसोयरेची अंमलबजावणी करावी, मराठा आंदोलानादरम्यान राज्यात मराठा बांधवावर दाखल झालेले गुन्हे मागे घ्यावेत या मागण्या मार्गी लावण्यासाठी १३- जुलैची दिलेली डेडलाईन सरकारने पाळावी याकडे लक्ष वेधण्यासाठी नांदेड येथे मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत ८-जुलै रोजी भव्य मराठा आरक्षण शांतता रॅली काढण्यात येणार आहे. रॅली लक्षवेधी करण्याचा निर्धार रविवारी सकल मराठा समाजाच्या नियोजन बैठकीत करण्यात आला. मराठा समाजाची परिस्थिती हलाखीची झाली असून अनेकांना रोजचा दिवस जड झाला आहे. हाती पैसा नसल्याने व शेतीतून अपेक्षीत उत्पन्न मिळत नसल्याने मुलां-मुलींना शिक्षण देणे व घरगाडा चालवणे कठीण झाले आहे.कर्जाचा डोंगर हटत नसल्याने समाजबांधव आत्महत्या करीत आहेत. युवकांच्या बेरोजगारीचा प्रश्न गंभीर झाला आहे. या सर्वांतून बाहेर येण्यासाठी आरक्षण हाच समर्थ पर्याय असून ते मिळवल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही. सरकारने मनोज जरांगे पाटील यांना दिलेला शब्द पाळावा. सगेसोयरेची तत्काळ अंमलबजावणी करावी, मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घ्यावेत, सातारा, निजाम गॅझेटच्या संदर्भाने मराठा समाजास कुणबी म्हणून मान्यता द्यावी अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या.

गावा-गावात होणार बैठका : मराठा क्रांती मोर्चाच्या धर्तीवर ८- जूलैची रॅली असून ती अभूतपूर्व व लक्षवेधी करण्यासाठी योगदान देण्याचे ठरले. गावा-गावात बैठका घेणे, प्रत्यक्ष भेटी घेऊन संवाद साधणे, समाजमाध्यमातून संपर्क ठेवणे ,वाहनांचे नियोजन करणे, स्वयंसेवक, रॅली दरम्यान पाणी , प्राथमिक वैद्यकीय तसेच अन्य सुविधा आदींवर या बैठकीत विस्ताराने चर्चा झाली.८-जुलै रोजी होणाऱ्या या रॅलीची सुरुवात, राज कॉर्नर ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे समारोप होणार आहे. या जनजागृती व संवाद रॅलीत सहभागी होण्याचे आवाहन सकल मराठा नांदेड च्या वतीने करण्यात आले.

## कृषी विज्ञान केंद्र पोखरणी च्या अंतर्गत आद्यरेषीय प्रात्यक्षिक




**नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट** नांदेड : कष्ट कमी करणारी कृषी विद्यापीठ परभणी निर्मित सुलभा बॅग ( खत पेरणी बॅग) चे आद्यरेषीय प्रात्यक्षिक मौजे धानोरा (मलकू) आणि तळणी येथे दिनांक १ जुलै रोजी देण्यात आले. मशागत करणारे शेतकरी, महिलांनी सांगितले की आम्हाला या सुलभा बॅग मुळे खत पेरणी सुलभ झालेली आहे.तसेच शारीरिक कष्ट आणि लागणारा वेळ यामध्ये देखील तुलना केली असता तफावत जाणवली. शेतकऱ्यांच्या मनोगतामध्ये त्यांनी सुलभा बॅग सोयीस्कर असल्याचे स्पष्ट केले. सदरील प्रात्यक्षिक विशेषज्ञ प्रा.अलका पवळे पाटील यांच्या अंतर्गत घेण्यात आले. त्यावेळी कृषी विज्ञान केंद्राच्या कर्मचारी हाडोळतीकर उपस्थित असून सदरील कार्यक्रम कृषी विज्ञान केंद्राचे संचालक डॉ एस.डी.मोरे तसेच वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. देविकांत देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.मात्र सभागृहाच्या बाहेर आल्यानंतर, मीडियाच्या कॅमेऱ्यासमोर पुन्हा शाब्दिक चकमक उडाली.

## शिक्षक बांधवांवर अन्याय करणारी अधिसूचना रद्द करा मागणीसाठी जिल्हा परिषदेसमोर शिक्षकांचे धरणे

**बीड / प्रतिनिधी**
(प्रतिनिधी)- सरकारने माध्यमिक शिक्षकांना वर्ग-2 मधून, शिक्षणाधिकारी,गटशिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी या पदासाठी पदोन्नतीपासून वंचित ठेवले असल्याने आज जिल्हा परिषद कार्यालय बीड समोर माध्यमिक शाळेच्या शिक्षकांचे धरणे आंदोलन 2 जुलै मंगळवार रोजी धरणे आंदोलन केले आहे. या आंदोलनाचा मुख्य हेतू असा की, राज्य शासनाने दि.28 डिसेंबर 2022 रोजी अधिसूचना काढत माध्यमिक शिक्षकांना वर्ग-2 मधून वंचित ठेवून त्यांना शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी,




उपशिक्षणाधिकारी या पदासाठी पदोन्नती मिळणार नाही अशी अधिसूचना काढली आहे. तरी जि.प.माध्यमिक शिक्षकांच्या वर्ग-2 पदोन्नतीमध्ये अडसर ठरणाऱ्या शालेय शिक्षण विभागाने काढलेली दि.28.12.2022 रोजीची अधिसूचना रद्द करुन सेवा प्रवेश नियम 1978 प्रमाणे राजपत्रित मोकळा करावा अशी मागणी सर्व शिक्षक बांधवांची आहे. तरी या आमच्या आंदोलनाची दखल न घेतल्यास यापुढे राज्याध्यक्ष व्हि.पी. फुलातंबकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली बेमुदत विना अन्न-पाणी घेता उपोषण करण्यात येईल असा इशारा जिल्हा कार्याध्यक्ष सुधाकर सावंत, लाड कांतीलाल, श्री.कोंडजकर, श्री.खतीब सर, श्री. शहाणे, श्री.देशमुख, श्री.सवासे यांनी दिला आहे.

## महावितरण समोर शेकापचा तब्बल दोन तास ठिय्या.. वीज पुरवठा सुरळीत न झाल्यास तिव्र आदोलन करणार..भाई ॲड.नारायण गोले पाटील

माजलगाव प्रतिनिधी माजलगाव महावितरणच्या निष्काळजीपणाबाबत अनेक तक्रारी असतांनाच तालुक्यातील रोशनपुरी, नागडगाव, सांडस चिंचोली, शिंपेटाकळी, देपेगाव, आळसेवाडी या गावांचा तब्बल एक महिनाभरापासून वीज पुरवठा खंडित असून महावितरण च्या गलथान कारभारास गावकरी कंटाळलेले असून याबाबत गावकऱ्यांनी अनेक वेळा लोकप्रतिनिधी कडे तक्रारी करून देखील त्याची दखल लोकप्रतिनिधींनी व प्रशासनातील अधिकाऱ्यांनी घेतली नाही त्याचा परिणाम म्हणून सहा गावातील महिलांना पाण्यासाठी ऐन पावसाळ्यात भटकंती करावी लागत असून पिठाच्या शक्य देखील बंद असल्यामुळे1 तालुक्यातून गावकरी दळण दळून नेत आहेत शिवाय मोबाईल चार्जिंग वडासाच्या त्रासामुळे वाढलेली रोगराई या सर्वांना गावकरी कंटाळले परंतु प्रशासनाला जाग आली नाही. म्हणून शेतकरी कामगार पक्ष आक्रमक झाला असून भाई ॲड नारायण गोले पाटील यांच्या पुढाकारातून आज ०२ जुलै रोजी रोशनपुरी, नागडगाव, शिंपेटाकळी, सांडस चिंचोली, देपेगाव, आळसेवाडी येथील सर्व गावकऱ्यांनी सकाळी १० वाजल्यापासून महावितरण कार्यालयासमोर तब्बल दोन तास प्रचंड घोषणाबाजी करत ठिय्या आंदोलन करून अधिकाऱ्यांना धारेवर धरले यावेळी अभियंता गुंगेवार यांनी चार दिवसात वीज पुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासित केले.

## दिन सबके आते है! महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा ट्विस्ट, बच्चू कडू महायुतीचा वचपा काढणार?

विधान परिषदेच्या एकूण 11 जागांच्या निवडणुकीसाठी येत्या 12 जुलैला मतदान होणार आहे. या निवडणुकीत महायुतीचं सध्याचं पक्षीय बलाबल पाहता महायुतीचे 8 उमेदवार जिंकून येऊ शकतात. पण महायुतीकडून या निवडणुकीसाठी 9 उमेदवार देण्यात आल्याने या निवडणुकीतील चुरस वाढली आहे. विशेष म्हणजे या निवडणुकीत प्रहार जशक्ती पक्षाची बार्गेनिंग पावर वाढणार आहे. महायुतीचा 9 वा उमेदवार जिंकून यावा यासाठी प्रहारचे आमदार बच्चू कडू यांची भूमिका महत्त्वाची असणार आहे. त्यामुळे बच्चू कडू या निवडणुकीत जायंट किलर ठरण्याची चिन्हं आहेत. बच्चू कडू आणि महायुतीमधील नेत्यांचे संबंध गेल्या काही दिवसांपासून ताणले गेल्याचं आपण बघितलं आहे.

## लिडकॉम ने प्रलंबित मागण्या मान्य न केल्यास नानासाहेब घोडके यांचा आमरण उपोषणाचा इशारा

**माजलगाव/परमेश्वर सोळंके:**संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे (लिडकॉम) प्रलंबित जुने व नवे कर्ज प्रकरणे मंजुरकरून सहभाग भरलेले प्रकरणाचे धनादेश लाभार्थ्यांना तात्काळ वाटप करून महामंडळास कायमस्वरूपी व्यवस्थापक देण्यात यावा या व इतर आपल्या हक्काच्या व न्याय्य मागण्यांचे निवेदन देऊन प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याची विनंती राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे बीड जिल्हाअध्यक्ष नानासाहेब घोडके यांनी काल मुंबई येथील महामंडळाच्या प्रत्यक्ष कार्यालयात जाऊन व्यवस्थापकीय संचालक धम्मज्योती गजभिये यांच्याकडे निवेदनाद्वारे करुन १५ दिवसात या न्याय्य मागण्या मान्य न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. नानासाहेब घोडके यांनी काल दि. २ जुलै २०२४ रोजी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महामंडळास जवळ जवळ सात ते आठ वर्षांपासुन बजेट नसल्या कारणे कर्ज प्रकरणे करता आलेली नाहीत. तसेच कोरोना काळात चर्मकार समाजाचे पैश्या अभावी व्यवसाय बंद पडलेले आहेत. त्यामुळे समाजाची उदरनिर्वाहासाठी कौटुंबीक हाल अपेष्टा होत आहेत. तरी शासनाने आपल्या महामंडळास १ हजार कोटी रु. मंजुर केल्यामुळे २०२३ पासुन कर्जप्रकरणे चालु करण्यात आलेली आहेत. आपल्या मंडळामध्ये बीड जिल्ह्यातील सर्व चर्मकार बांधवांनी दाखल केलेले नविन (एकुण ११) मुदती कर्ज प्रकरणे व जुने (एकुण २०) मुदती कर्ज प्रकरणे तात्काळ मंजुर करण्यात



यावेत. तसेच नविन (एकुण ०३ ) शैक्षणिक कर्ज प्रकरणांना प्राधान्याने मंजुरी देण्यात यावी.
• जुन्या लघुऋण वित्त योजनेअंतर्गत मंजुरी प्राप्त झालेल्या (एकुण ३४), जुन्या मुदती कर्ज योजना अंतर्गत मंजुरी प्राप्त झालेल्या (एकुण १५), नविन मुदती कर्ज योजना अंतर्गत मंजुरी प्राप्त झालेल्या (एकुण २२), नविन महिला अधिकारीता योजना अंतर्गत मंजुरी प्राप्त झालेल्या (एकुण ०३), व नविन लघुऋण वित्त योजने अंतर्गत मंजुरी प्राप्त झालेले ०२ लाभार्थ्यांचे धनादेश तात्काळ वाटप करण्यात यावेत. तसेच संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ बीड कार्यालयास कायमस्वरूपी व्यवस्थापक देण्यात यावा.

जिल्हा पातळीवर दि.०२/०८/२०२३ रोजी दैनिकामध्ये महामंडळाने जी जाहीरात दिली होती त्या जाहिरातीमध्ये कमी टार्गेट दिलेले होते त्यामुळे चर्मकार समाजाने कर्ज प्रकरणे दाखल केले नाहीत. तरी नविन प्रति जिल्हा कर्ज प्रकरणाचे टार्गेट तात्काळ देऊन नविन कर्ज प्रकरणे चालु करण्यात यावीत. असेही निवेदन राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे बीड जिल्ह्या अध्यक्ष नानासाहेब घोडके यांनी दिले आहे. यावेळी धम्मज्योती गजभिये यांनी निवेदनात दिलेल्या मागण्या १५ दिवसात मंजूर करण्यात येतील अस्वासन दिले आहे. वरील सर्व बाबी लक्षात घेऊन १५ दिवसांच्या आत प्रलंबीत प्रकरणांना मंजुरी देऊन मंजुर झालेल्या योजनानिहाय अंतर्गत मंजुरी प्राप्त झालेल्या लाभार्थ्यांचे धनादेश १५ दिवसांच्या आत देण्यात यावे नसता लोकशाही मार्गाने आमरण उपोषण जिल्हा कार्यालयासमोर करण्यात येईल. याची सर्वस्वी जबाबदारी आपल्यावर राहिल असा इशारा राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे बीड जिल्हा अध्यक्ष नानासाहेब घोडके यांनी यांनी दिला आहे.

## संपादकीय

### ' असंच काहीसं सुचलेलं '

कवयित्री अंकिता मांगले - टोणगे लिखित "असंच काहीसं सुचलेलं" या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा डोंबिवली येथे अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत नुकताच संपन्न झाला.

या प्रकाशन सोहोळ्यासाठी सारिका विलास नरोटे, अरुणा अरुण मांगले, दिपाली महेंद्रे , विजया सीताराम नरोटे, हर्षवर्धन अनिलकुमार टोणगे, अंकिता हर्षवर्धन टोणगे मांगले, सीताराम महादेव नरोटे, समाजमाध्यम तज्ञ मनिष पंडित, अतुल वसंत शिलवंत व त्यांची आई रुचिता रविंद्र मांगले उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून लेखिका प्रा.प्रज्ञा पंडित व शारदा प्रकाशन चे प्रकाशक प्रा.डॉ.संतोष राणे उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रा.डॉ.संतोष राणे म्हणाले की, " कविता सुचण्याची प्रक्रिया दीर्घकाळाची असते. आशयसंपन्न कवितेसाठी चिंतन आणि मनन महत्वाचे असून कवयित्री अंकिता यांना विविधांगी अनुभवातून कविता स्फूरलेली आहे. नात्याची वीण घट्ट करणारी त्यांची कविता वाचकांच्या मनात कायम रुंजी घालेल." कवितेत कवीचे आत्मवृत्त असल्याचे सांगून प्रा.राणे पुढे म्हणाले ," आजची युवा पिढी आवर्जून कविता वाचते आहे. कवितेबद्दल समाज माध्यमांवर व्यक्त होत आहे. ही अतिशय आशादायक गोष्ट असून कवितेच्या पुस्तकांना जास्त मागणी आहे."

" स्त्री मनाचा कानोसा घेण्याचे महत्वपूर्ण काम कवयित्री अंकिता यांनी केल्याचे सांगून लेखिका प्रज्ञा पंडित म्हणाल्या की," आज सर्व क्षेत्रात स्त्रिया आघाडीवर आहेत. शिक्षण , नोकरी , कुटुंब अश्या सर्वच पातळ्यांवर स्त्री यशाची नवी तोरणं बांधत आहे. हे कवितेतून टिपण्यात कवयित्री यशस्वी झालेली आहे.स्त्री मनाचा हुंकार टिपून त्याला शब्दातून नवे आयाम देण्याचे काम कवयित्री अंकिता यांनी केले आहे."

कवयित्री अंकिता मांगले - टोणगे मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या," माझ्या कवितेची नाळ आईबरोबर जोडली गेलेली आहे. आईवरील माझ्या पहिल्या कवितेचे सर्वांनीच कौतुक केले. त्यातून मला प्रेरणा मिळाली.

# नियम धाब्यावर बसवून कामगार अधिकारी मुंडे वस्तु साहित्य वाटपात ठेकेदारांचे हट्ट पुरवतात - शेख अमर

नियम धाब्यावर बसवून कामगार अधिकारी मुंडे वस्तु साहित्य वाटपात ठेकेदारांचे हट्ट पुरवतात - शेख अमर



बीड (प्रतिनिधी) बांधकाम कामगांराना गृहोपयोगी वस्तु व सुरक्षा किट साहित्याचे वाटप ठेकेदार (संस्था) यांच्या कार्यालय गोडावुन येथुन वाटप न करता शासन निर्णयानुसार तात्काळ वितरणासाठी तालुका स्तरावर 9 शिबिरे आयोजित करूनच वाटप करावे नसता दिनांक ७ जुलै २०२४ पासुन महाराष्ट्र बांधकाम सघटनेच्या वतीने बीड जिल्हा कामगार अधिकारी यांच्या कार्यालयासमोर बेमुदत उपोषणास बसणार असे सघंटनेचे संस्थापक अध्यक्ष अमर शेख, बीड जिल्हा अध्यक्ष शेख नसीर, बीड महिला अघाडी अध्यक्ष संजीवनी राऊत यांनी दिलेल्या निवेदनातून म्हटले आहे. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचा प्रस्ताव 01.2021 च्या शासन आदेशानुसार घरगुती वस्तूंच्या वितरणाच्या योजनेला शासनाने मान्यता दिली आहे. मंडळाच्या नोंदींमध्ये 18.03.2021 च्या खरेदी समितीच्या गट क्रमांक 01 आणि मे 02 च्या गट क्रमांक 02 च्या बैठकीत सक्रिय (जिवंत) बांधकाम कामगारांना घरगुती वस्तूंचा पुरवठा करण्याबाबतचा प्रस्ताव मफतलाल इंडस्ट्रीजची स्वीकृती शिफारस 24.11.2023 रोजी शासन निर्णयासाठी रु.8820/- (वस्तू आणि सेवा कर वगळून) च्या निर्धारित दराने सादर करण्यात आली. सदर प्रस्तावास शासन संदर्भ क्र.03 दिनांक 01.12.2023 अन्वये मंजूरी देण्यात आली आहे. नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर विभागात बांधकाम कामगारांना घरगुती वस्तूंच्या वितरणासाठी निविदा क्रमांक 01/2021. मफतलाल इंडस्ट्रीज लि मंडळाचे पत्र क्र. 2194 त्यानुसार मे. मफतलाल इंडस्ट्रीज लि. त्यांना दिनाकं 27.12.2023 रोजी शासन मान्यतेनुसार पुरवठादार संस्था गट क्र. 01- नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर विभागासाठी करार झाल्या प्रमाणेच शासन मान्यतेनुसारच सक्रीय (जिवंत) बांधकाम कामगारांना घरगुती वस्तूंचा पुरवठा, वाहतूक, साठवण आणि वितरण यासाठी घरगुती वस्तूंच्या प्रति संच रु. 8820/- अधिक वस्तू आणि सेवा कर पुरवठा ऑर्डरच्या दराने लावला आहे. नागपूर आणि छत्रपती संभाजी नगर विभागातील सहाय्यक कामगार आयुक्त/शासकीय कामगार अधिकारी (कार्यालय प्रमुख) यांनी विहित नमुन्यात सक्रिय (जिवंत) बांधकाम कामगारांनी सादर केलेल्या यादीनुसार आणि कार्यालय प्रमुखांनी प्रमाणित केलेल्या, घरगुती संच वस्तूंचे वाटप केले पाहिजे. ई-निविदा च्या अटी व शर्ती च्या आदेश क्रमाकं ९ आदेश नुसार संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक कामगार आयुक्त/शासकीय कामगार अधिकारी (कार्यालय प्रमुख) यांच्या समन्वयाने स्वखर्चाने घरगुती वस्तूंच्या वितरणासाठी जिल्हा/तालुका स्तरावर 9 शिबिरे आयोजित करावीत तरी निविदेच्या अटी व शर्ती नुसारच हे साहित्य वाटप करावे नसता दिनांक ०७ जुलै २०२४ सोमवार पासुन बीड जिल्ह्यातील महाराष्ट्र बांधकाम मजूर सघंटना पदाधिकारी बीड जिल्हा कामगार अधिकारी श्री मुंडे यांच्या कार्यालयासमोर बेमुद्दत उपोषनास बसणार असा इशारा सघंटनेचे सस्थांपक अध्यक्ष नगरसेवक अमर शेख, बीड जिल्हा अध्यक्ष शेख नसीर, बीड जिल्हा महिला अध्यक्ष संजीवनी राऊत व त्यांच्या सहकाऱ्यांनी निवेदनातून दिला आहे.

# पिंपरनई येथील गणेश नगर वस्तीवरील ग्रामस्थांची चिखलातुन पायपीट; मातोश्री पाणंद रस्ते योजना ठरतेय मृगजळ :- डॉ.गणेश ढवळे

### शासनदरबारी पाठपुरावा करून दमलो हाती केवळ आश्वासन:- कृष्णा वायभट ( ग्रां.सदस्य)

पिंपरनई ग्रुप ग्रामपंचायत असुन गणेश नगर वस्तीवरील मी विद्यमान ग्रामपंचायत सदस्य असुन दिड वर्षांपासून शासन दरबारी कागदपत्रे घेऊन पाठपुरावा केला आहे. ग्रामसेवक यांनी उन्हाळ्यात रस्तेकामासाठी ईस्टीमेट तयार केले असल्याचे सांगतातमात्र रस्त्याचे काम अजूनही सुरू नाही.तातडीने रस्ताकाम सुरू न झाल्यास आम्ही रास्तारोको आंदोलन करणार आहोत.

.गणेश ढवळे लिंबागणेशकर
मो.नं.८१८०९२७५७२

### रखडलेली मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/ पाणंद रस्ते योजना सुरू करा:- डॉ.गणेश ढवळे

शासनामार्फत मातोश्री पाणंद रस्ते योजनेंतर्गत मराठवाड्यातील ८ जिल्ह्यातुन ९३५० कामे प्रस्तावित असुन मराठवाड्यात २०७३ कामे मंजूर करण्यात आली आहेत त्यापैकी केवळ ६७४ कामांनाच प्रशासकीय मान्यता मिळालेली असुन ६३८ कामांची स्थळ पाहणी करण्यात आलेली आहे.त्यापैकी ५८६ कामांनाच कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.शासनाने मंजुरी दिलेल्या २०७४ कामांपैकी केवळ ४८४ कामेच म्हणजे २३ टक्केच कामे पूर्ण झाल्यामुळे ग्रामीण भागात ही योजना मृगजळ ठरू पहात आहे.त्यामुळे ग्रामीण भागातील शाळा,दुधदुभते, भाजीपाला, बाजारहाट, शेतमाल वाहतुकीचा प्रश्न प्रलंबित आहे.दरवर्षी पेरणीसाठी बि -बियाणे नेताना त्याचबरोबर पिक काढणीनंतर शेतीमाल वाहतुकीसाठी रस्ता नसल्याने शेतक-यांची अडचण होत असुन प्रलंबित पाणंद रस्ता कामे तातडीने पूर्ण करण्यात यावीत.

डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर
मो.नं.८१८०९२७५७२




**लिंबागणेश/प्रतिनिधी**

लिंबागणेश:- ग्रामीण भागात शेतवस्तीवर जाण्यासाठी दळणवळणाची साधने व मजुरांच्या हाताला काम मिळावे या उदात्त हेतूने मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते योजना अस्तित्वात आली मात्र पावसाळा सुरू होण्यापूर्वी रस्ते काम पूर्ण होणे अपेक्षित असताना पावसाळा सुरू होऊन सुद्धा शासकीय नियमांच्या कचाट्यात योजना सापडली असून प्रसिद्धी माध्यमांद्वारे गाजावाजा करण्यात आलेल्या योजनेचे वास्तव मात्र क्लेशदायक असुन अखेर काही गावांमध्ये ग्रामस्थांनी स्वखर्चाने रस्ते काम करण्यास सुरुवात केली असुन ग्रामस्थांमध्ये तिव्र भावना उमटत आहेत. बीड तालुक्यातील पिंपरनई येथील गणेशनगर वस्तीवरील ग्रामस्थांना मुलांच्या शाळा, बाजारहाट, दवाखाना आदि कामांसाठी सध्या पावसाळ्यात चिखल तुडवीत जावे लागत असल्याने शासनाप्रती तिव्र नाराजी दिसून येत आहे.

२५ वर्षापासुनचा वनवास संपणार कधी??बाळंतिणी, दवाखाना, लेकरांच्या शाळा चिखल तुडवीत :- सरस्वती वायभट

बीड तालुक्यातील मौजे.पिंपरनई ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत गणेशनगर वस्ती २५ वर्षांपासून वास्तव्यास असुन असुन २५-३० घरांचा उंबरठा असलेली १५० च्या जवळपास लोकसंख्या गावापासून १ किलोमीटर अंतरावर असुन रस्ता नसल्याने शालेय मुलांची शाळा,दुधदुभते, भाजीपाला,किराणा, बाजारहाट आदि कामांसाठी पावसाळ्यात गुडघाभर चिखल तुडवीत जावं लागतं.२५ वर्षांपासूनचा आमचा वनवास कधी फिरतोय माहीत नाही अशी उद्विग्न प्रतिक्रिया सरस्वती वायभट यांनी डॉ.गणेश ढवळे यांच्याशी बोलताना दिली.

# सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जातीच्या शासकीय निवासी शाळांमध्ये शैक्षणिक प्रवेश प्रक्रिया सुरु

**बीड/प्रतिनिधी**, दि. 2 सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यामध्ये 11 शासकीय निवासी शाळा सुरू आहेत. छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यामध्ये वैजापूर येथे, जालना जिल्ह्यामध्ये जालना, भोकरदन, बदनापूर येथे, बीड जिल्ह्यातील पाटोद, शिरूर कासार आणि परळी वैजनाथ येथे आणि परभणी जिल्ह्यातील हदगाव पावडे तालुका शेलु अकोले तालुका जिंतूर, मानवत पूर्णा येथे या शाळा सुरू असून प्रत्येक शाळांमध्ये इयत्ता 6 वी ते 10 वी या वर्गासाठी प्रत्येकी 40 जागा असून एका शाळेमध्ये 200 विद्यार्थ्यांची क्षमता असून छत्रपती संभाजी नगर जिल्हामध्ये 2200 विद्यार्थी क्षमतेच्या या शाळेमध्ये मोफत भोजन, राहणे, वहया, पुस्तके, गणवेश इत्यादी पुरविण्यात येतात. तसेच शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासासाठी काळजीपूर्वक लक्ष देण्यात येते. शैक्षणिक वर्ष 2024-25 साठी प्रवेश प्रक्रिया सुरू झालेली आहे.

शासकीय निवासी शाळेचे नाव, मुख्याध्यापकाचे नाव व मोबाईल क्रमांक. छत्रपती संभाजी नगर अनुसूचित जाती व नवबौध्द मुलांची शासकीय निवासी शाळा, वैजापूर शिवाजी माळी मोबाईल नंबर 89 75443483 जालना अनुसूचित जाती व नवबौध्द मुलींची शासकीय निवासी शाळा जालना, श्रीमती सूर्यकला भीमराव गोसावी, मोबाईल क्रमांक 83780005222 अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा, भोकरदन रघुनाथ खेडकर मोबाईल क्रमांक 9420825982 अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलींची शासकीय निवासी शाळा बदनापूर डॉ. दिलीप गिरी मोबाईल क्रमांक 9421646974 जिल्हा अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलींची शासकीय निवासी शाळा, पाटोदा एन.एस. तरकसे मोबाईल क्रमांक 9765003943 अनुसूचित जाती व नवबौध्द मुलींची मुलांची शासकीय निवासी शाळा, शिरूर कासार श्रीमती अस्मिता जावळे मोबाईल क्रमांक 9822141610 अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलींची शासकीय निवासी शाळा, परळी वैजनाथ बी.एम. सोनवणे, मोबाईल क्रमांक 9922329028, परभणी अनुसूचित जातीय नवबौध्द मुलींची शासकीय निवासी शाळा मानवत, बी.के. खोडके मोबाईल क्रमांक 9309860960 अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा, हातगाव पावडे तालुका सेलू रवी जोशी मोबाईल क्रमांक 9404580235 अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलींची शासकीय निवासी शाळा अकोली तालुका जिंतूर बि.एन. कोरकन मोबाईल क्रमांक 99210041 अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा पूर्णा, श्रीमती हटकर मोबाईल क्रमांक 9423441669

सर्व विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी वरील दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधवा, असे आवाहन श्रीमती जयश्री सोनवणे प्रादेशिक उपयुक्त समाज कल्याण विभाग छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

# माहितीचा अधिकार; द्वितीय अपिलासाठी एसएमएस, ई- मेल,

## व्हॉटसअॅप ग्रुप व वेबसाईटवर नोटीस, निर्णय मिळणार

**माजलगाव प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर दि.२- माहितीचा अधिकार कायद्याअंतर्गत राज्य माहिती आयोगाच्या खंडपीठाकडे असणाऱ्या द्वितीय अपिल सुनावणीसाठीची नोटीस तसेच अपिल निर्णय इ. आता एसएमएस, ई-मेल. व्हॉट्स अॅप ग्रुप व वेबसाईटवर देण्यात येण्याची व्यवस्था खंडपीठाने केली आहे, अशी माहिती राज्य माहिती आयोगाच्या खंडपीठ छत्रपती संभाजीनगरचे राज्य माहिती आयुक्त मकरंद रानडे यांनी दिली आहे.

राज्य माहिती आयोगाच्या खंडपीठाद्वारे देण्यात आलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, द्वितीय अपिलासाठी सुनावणीची नोटीस ही टपालाद्वारे पाठविण्यात येते. मात्र बऱ्याचदा या नोटीस अपिलार्थिंना, जनमाहिती अधिकाऱ्यांना वेळेत प्राप्त होत नसल्याचे निदर्शनास आले होते. त्यासाठी द्वितीय अपिल सुनावणीसाठी अपिलार्थी, जनमाहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांना एसएमएस, ई- मेल, वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. तसेच त्या त्या जिल्ह्याच्या नोडल अधिकाऱ्यांच्या व्हॉट्स अॅप ग्रुपवर सुद्धा ह्या नोटीस उपलब्ध करुन देण्यात येतील. आयोगाचे संकेतस्थळ www.sic.maharashtra.gov.in वर देखील नोटीस, अपिल निर्णय पाठविण्यात येणार आहे. तरी सर्व संबंधितांनी आयोगाच्या वेबसाईटचे नियमित अवलोकन करुन नोटीस प्राप्त करुन घ्यावी व सुनावणीस उपस्थित रहावे. आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केलेल्या नागरिकांनी व खंडपीठाच्या कार्यक्षेत्रातील आठही जिल्ह्यातील कार्यालयांनी याची नोंद घ्यावी असेही राज्य माहिती आयुक्त राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर मकरंद रानडे यांनी कळविले आहे.

# शासकीय वसतीगृहात प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी अर्ज करावे

**बीड/प्रतिनिधी**, दि. 2 सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या अंतर्गत चालविण्यात येत असलेल्या मागासवर्गिय मुला-मुलींचे शासकीय वसतीगृह जि. बीड येथील रिक्त जागेसाठी सन 2024-25 या शैक्षणिक वर्षाकरिता प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली आहे. शालेय, महाविद्यालय, व्यवसायक व बिगरव्यवसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या सर्वविद्यार्थ्यांनी वसतीगृहात प्रवेश मिळण्यासाठी अर्ज करण्यात यावे.शालेय विद्यार्थ्यांकरिता दि. 12 जुलै 2024 पर्यंत अर्ज सादर करावा. इयत्ता 10 वी व 11 वी नंतरच्या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी व पदव्युत्तर, पदवी, पदविका (व्यवसायिक अभ्यासक्रम वगळून) यांनी दि. 31 जुलै 2024 पर्यंत अर्ज शासकीय वसतिगृहात सादर करावे, असे आवाहन समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त एस. एन मेश्राम यांनी केले आहे. वसतीगृहाचे नाव व संख्या मुलींचे शासकीय वससतीगृह अंबाजोगाई 80,धारुर 100 माजलगाव 80, पाटोदा 100, शिरुर कासार 100, आष्टी 80, बीड 75 मुलांचे शासकीय वसतीगृह अंबाजोगाई 100,केज 100, पाटोदा 100, बीड 75,परळी वैद्यनाथ 100 आणि गेवराई 100 अशी विद्यार्थी संख्या आहे.

# एकाच कुटुंबातील मुलगी आणि आईलाही मिळणार लाडकी बहीण योजनेचा लाभ

महाराष्ट्र सरकारने राज्यभरातील महिलांना मोठी खूशखबर दिली आहे. महाराष्ट्र सरकारकडून राज्यातील महिलांना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतून आता दर महिन्याला 1500 रुपये मदत म्हणून दिले जाणार आहेत. या योजनेतून राज्यातील 21 ते 60 वयोगटातील महिलांना दर महिन्याला 1500 रुपयांची मदत मिळेल, अशी माहिती सरकारने दिली होती. यानंतर या योजनेत आणखी बदल करत सरकारने 21 ते 65 वयोगटातील महिलांना या योजनेचा लाभ घेता येईल, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केलं आहे. राज्य सरकारच्या घोषणेनुसार, एकाच कुटुंबातील मुलगी आणि आईलाही आता या योजनेचा लाभ मिळणार आहे. फक्त दोघींचं वय हे 21 ते 65 वयाच्या दरम्यान असणं आवश्यक आहे.

योजनेसाठी नेमक्या अटी-शर्ती काय?

१. सदर योजनेत अर्ज करण्याची मुदत दि.१ जुलै, २०२४ ते १५ जुलै, २०२४ पर्यंत ठेवण्यात आली होती. या मर्यादेत सुधारणा करण्यात येत असून आता सदर मुदत २ महिने ठेवण्यात येत असून ती दि.३१ ऑगस्ट, २०२४ पर्यंत लाभार्थी महिलांना अर्ज करता येईल. तसेच दि.३१ ऑगस्ट, २०२४ पर्यंत अर्ज करण्यात आलेल्या लाभार्थी महिलांना दि.०१ जुलै, २०२४ पासून दर माह रु.१५००/- आर्थिक लाभ देण्यात येणार आहे.२. या योजनेच्या पात्रतेमध्ये आधिवास प्रमाणपत्र आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले होते. आता लाभार्थी महिलेकडे आधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसेल तर त्या ऐवजी १५ वर्षापूर्वीचे १. रेशन कार्ड २. मतदार ओळखपत्र ३. शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र ४. जन्म दाखला या ४ पैकी कोणतेहे ओळखपत्र/प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येणार आहेत.

# सुरेश शेळके यांचा सेवागौरव सोहळा संपन्न

**माजलगाव (प्रतिनिधी)**

म शि प्र मंडळाच्या सुंदरराव सोळंके महाविद्यालयात कार्यरत असलेले मुख्य लिपिक सुरेश एकनाथ शेळके यांच्या सेवापुर्ती निमित्ताने सेवागौरव करण्यात आला.

सुरेश शेळके यांच्या सेवागौरव निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. जी. के सानप,उपप्राचार्य डॉ. नंदकिशोर मुळे, उपप्राचार्य डॉ एम. ए. कव्हळे, प्रबंधक प्रशांत चव्हाण, अधीक्षक सतीश एरंडे,माजी अधिक्षक पुरुषोत्तम पोटभरे यांची उपस्थिती होती.यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. सानप म्हणाले की सुरेश शेळके यांनी मुख्य लिपिक म्हणून प्रमाणितपणे सेवा केली प्रशासकीय कामातील त्यांच्या अनुभवाचा फायदा महाविद्यालयाला झाला. त्यांनी महाविद्यालयात काम



करत असताना नोकरी न समजता सेवा म्हणून आपले कर्तव्य पार पाडले. यावेळी सेवपूर्ती निमित्त बोलताना सुरेश शेळके म्हणाले की शैक्षणिक क्षेत्रात काम करण्याची संधी मिळाली हे भाग्य समजतो. ग्रामीण भागातील विदयार्थी केंद्रबिंदु ठेवून मी माझी सेवा प्रामाणिक करण्याचा प्रयत्न केला आहे. यावेळी प्रा. संजय बागुल व प्रबंधक प्रशांत चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते सुरेश शेळके यांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी. एस. बनसोडे यांनी केले तर आभार एकनाथ मस्के यांनी मानले. यावेळी प्राध्यापक, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# लहान मुलीचा श्वासच बंद पडला, फिरायला आलेले दोन डॉक्टर देवासारखे धावले

लोणावळा येथील दुर्घटनेत अन्सारी कुटुंबातील 10 जण पाण्यात वाहून गेले होते. त्यापैकी पाच जणांचा मृत्यू झाला आहे. तर पाच जण वाचले आहेत. या दुर्घटनेत एका लहान मुलीच्या हृदयाचे ठोकेच बंद पडले होते. तिचा श्वास कोंडला गेला होता. पण तेवढ्यात या परिसरात फिरायला आलेले दोन डॉक्टर देवासारखे धावून आले. त्यांनी या मुलीला सीपीआर दिला. त्यामुळे तिच्या हृदयाचे ठोके सुरू झाले. मुलगी वाचली. जर हे दोन डॉक्टर तिथे नसते तर या मुलीचं जगणं मुश्किल झालं असतं, असं सूत्रांनी सांगितलं.

अन्सारी कुटुंब हे उत्तर प्रदेशातील आग्रा येथील सय्यद नगरचं आहे. हे कुटुंब पुण्यात नातेवाईकाच्या लग्नाला आलं होतं. लग्न समारंभ आटोपल्यानंतर पिकनिकला म्हणून ते लोणावळ्याच्या भूशी डॅमला आले होते. एकूण 17 लोक डॅमला आले होते. दुपारी सर्वजण भूशी डॅमच्या मागे धबधब्याखाली गेले. याचवेळी भूशी डॅमच्या कॅचमेंट एरियात प्रचंड पाऊस झाला. प्रचंड पाऊस झाल्याने भूशी डॅम ओव्हरफ्लो झाला. धरण पूर्ण भरल्यानंतर पाण्याचा फ्लो वाढेल असं अन्सारी कुटुंबाला वाटलं नव्हतं.

अचानक पातळी वाढली

जेव्हा अचानक पाण्याची पातळी वाढली आणि पाण्याचा वेग वाढला तेव्हा सर्वांनी एका दगडावर उभं राहून वाचवण्याचा प्रयत्न केला. सर्वजण एकमेकांना बिलगून होते. काही लोक सुरक्षित ठिकाणी होते. तर काही कॅचमेंट एरियाजवळ होते. या पाण्यात एकूण 10 लोक अडकले. त्यापैकी पाच लोकांना वाचवण्यात यश आलं. तर पाच लोक वाहून गेले. पहिल्या दिवशी वाहून गेलेल्या पाच जणांपैकी तिघांचे मृतदेह लगेचच सापडले. तर एकाचा मृतदेह उशीरा सापडला. तर आणखी एकाचा मृतदेह दुसऱ्या दिवशी सापडला होता.

# माजी नगर सेवकाने भावा सह भाऊजईला मारहाण करून भाऊजईचे मंगळसुत्र हिसकावुन नेले.

**माजलगाव. प्रतिनिधि-** शहरातील माजी नगरसेवक दिपक जालिंदर मेंडके व त्यांचा चुलता राजेंद्र,त्यांचा चुलत भाऊ यांनी संगनमत करून किशोर जालिंदर मेंडके, त्यांची पत्नीस मारहाण करत दिपक मेंडके याने भाऊजई च्या गळ्यातील मंगळसुत्र हिसकावून घेतल्याच्या फिर्यादी वरुन तीन आरोपीं विरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

या बाबत शहरातील जिजामाता नगर येथे राहणाऱ्या पिडीत महिलेन माजलगाव शहर पोलीस ठाण्यात १जुलै रोजी दिलेल्या फिर्यादी नुसार त्या व त्यांचा पती किशोर जालिंदर मेंडके हे सायंकाळी ५वा.च्या सुमारास घरी



असतानां प्रकरणातली आरोपी दिपक जालिंदर मेंडके रा.धारुर रोड,माजलगाव, राजेंद्र सटवा मेंडके रा.चिंचगव्हाण ,ता.माजलगाव, श्रीकांत राजेंद्र मेंडके रा.चिंचगव्हाण,ता.माजलगाव हे संगनमत करून आले होते. आणि त्यांनी किशोर जालिंदर मेंडके यांना शिविगाळ करण्यास सुरुवात केली त्यावर पिडीता घराबाहेर आली आणि त्यांना म्हणाली की, त्यांच्या पतीला का शिविगाळ करत आहात असे म्हणताच दिपक मेंडके याने तोंडावर चापट मारुन गळ्यातील ५ग्राम वजनाचे ३०हजार रुपये किंमतीचे मंगळसुत्र हिसकावुन घेतले.तसेच तिघांही पती,पत्नीस मारहाण केली अश्या फिर्यादी वरुन उल्लेखीत नमुद आरोपीं विरोधात गुन्हे दाखल करण्यात आले असुन पुढिल तपास पोह.एम.एच. तोटेवाड करत आहेत.

दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
बुधवार ३ जूले २०२४


या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

# मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना : उत्पन्नाचा दाखला नसला तरीही मिळणार महिन्याला दीड हजार,



राज्य सरकारकडून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची घोषणा करण्यात आली आहे. या योजनेसाठी लाभार्थी महिलांना राज्य सरकारकडून मोठा दिलासा देण्यात आला आहे. पात्र महिलांना अर्ज भरण्यासाठी काही कागदपत्रांची आवश्यकता होती. पण संबंधित कागदपत्रे तयार करण्यासाठी राज्यभरात ठिकठिकाणी तहसील कार्यालयांबाहेर महिलांची मोठी गर्दी झालेली बघायला मिळाली. त्यामुळे राज्य सरकारने या योजनेसाठी लाभार्थी महिलांना कागदपत्रांमध्ये शिथिलता दिली आहे. या योजनेसाठी सर्वात महत्त्वाची अट ही महिलेच्या कुटुंबाचं उत्पन्न हे अडीच लाखांपेक्षा जास्त नसावं अशी आहे. पण यासाठी उत्पन्नाचा दाखला पुरावा म्हणून द्यावा लागेल. पण आता तहसील कार्यालयांवर होणारी गर्दी पाहता राज्य सरकारने उत्पन्नाचा दाखला उपलब्ध नसेल तर ज्या कुटुंबाकडे पिवळे आणि केशरी रेशनकार्ड उपलब्ध असेल त्यांना उत्पन्नाच्या दाखला प्रमाणपत्रातून सुट देण्यात येईल, अशी घोषणा केली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्वत: याबाबतची घोषणा केली आहे.

# नामदेवराव क्षिरसागर यांच्या निधनाने पत्रकारिता क्षेत्राची हानी; उमेश मोगरे कर



**माजलगाव (प्रतिनिधी)**बीड जिल्ह्याचे आग्रजांनी दैनिक चंपावती पत्राचे संपादक नामदेवराव क्षीरसागर यांच्या निधनाने बीड जिल्ह्यातील नव्हे तर मराठवाड्यातील पत्रकार क्षेत्राची हानी झाली असल्याचे प्रतिमान पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर यांनी केले ते येथील शासकीय विश्रामगृहावर आयोजित श्रद्धांजलीच्या कार्यक्रमात बोलत होते या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संपादक प्रदीप कुलकर्णी हे होते

पुढे बोलत ते म्हणाले की नामदेव क्षीरसागर यांनी साठ वर्षापेक्षा जास्त वर्ष या पत्रकार क्षेत्रात घालवले असून त्यांनी साठ वर्षांपूर्वी दैनिक चंपावती पत्र हे वर्तमानपत्र काढून जिल्ह्यातील प्रश्नांची मांडणी या वर्तमानपत्रात करून ते सोडवण्यासाठी वेळप्रसंगी आंदोलने केली तसेच आपल्या वर्तमानपत्रातून कोणाचेही चारित्र्य हरण होणार नाही याची काळजी घेत पत्रकारिता केली विशेष म्हणजे त्यांचे वर्तमानपत्रावर एवढे प्रेम होते की त्यांचे निधन होण्याअगोदर त्याने आपला अंक प्रकाशित केला होता आशा या महान संपादकास त्यांच्या पावलावर पाऊल टाकून आपण पत्रकारिता करावी हे त्यांना श्रद्धांजली ठरेल असे प्रतिपादन केले यावेळी साप्ताहिक परिसर चे संपादक प्रदीप कुलकर्णी यांनी आपले श्रद्धांजलीपर विचार मांडताना मला पत्रकार म्हणून कै. नामदेवराव यांनी आपल्या दैनिकात संधी देऊन मला मार्गदर्शन केले त्यामुळेच आज मी पत्रकारिता क्षेत्रात स्वतःचे वर्तमानपत्र चालवत असून त्यांच्यामुळेच मी घडलो असल्याचे सांगितले त्यानंतर तुकाराम बापू येवले यांनी आपले मनोगत व्यक्त करताना नामदेवराव यांच्या पत्रकारितेचा आदर्श आपण सर्वांनी घ्यावा असे आवाहन उपस्थित त्यांना केले या कार्यक्रमावर मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष हरीश यादव, सुधाकरराव देशमुख, कमलेश जाब्रश, महेंद्र मस्के, तानाजी शिरसाट, परमेश्वर सोळंके, विष्णू उगले, अरविंद ओव्हाळ, वैजनाथ धायतिडक , राजरत्न डोंगरे, दिनकर शिंदे, राज गायकवाड, दत्ता येवले यांच्यासह बहुसंख्य पत्रकार उपस्थित होते.



तेलगाव नगरीचे लोकप्रिय व्यक्तीमत्व तथा सरपंच श्री बाबुरावजी धुमाळ यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना सचिव सुरेश लगड

# भव्य वारकरी दिंडी...विठुरायाचा जयघोष लेकीच्या जन्माचे असेही स्वागत



कृष्णा जैवाळ सुनीता जैवाळ यांची कन्या राही हीचे स्वागत करतांना अनाथांची माऊली रामेश्वर महाराज पवार, शारदा पवार आदी.तर दुसऱ्या छायाचित्रात वारकरी विद्यार्थ्यांनी काढलेली वारकरी दिंडी

सिल्लोड: एकीकडे मुलींचा जन्मदर मोठ्या प्रमाणात घसरत असताना दुसरीकडे पहिलेच अपत्य मुलगी जन्माला आली म्हणून नवजात लेकीचे बालवारकरी विद्यार्थ्यांच्या भव्य वारकरी दिंडीचे आयोजन करून विठू नामाच्या जयघोषात आगळ्या वेगळ्या पद्धतीने स्वागत करत जैवाळ दांपत्याने समाजासमोर आदर्श उभा केला आहे. माऊली वारकरी गुरुकुल आश्रम अनाथालय तथा संत ज्ञानेश्वर माध्यमिक विद्यालय निल्लोड फाटा ता. सिल्लोड येथे मुख्याध्यापक पदावर कार्यरत असणारे कृष्णा जैवाळ व पत्नी सुनीता जैवाळ यांना पहिलेच आपत्य कन्यारत्न जन्माला आले.बाळंतपणानंतर सुनीता ह्या सव्वा महिन्यानंतर आपल्या माहेराहून सासरला परतल्या. कन्येच्या रूपाने लक्ष्मी घरात आली म्हणून माऊली वारकरी गुरुकुल आश्रम निल्लोड फाटा येथे वारकरी शिक्षणाचे धडे घेत असलेल्या बाल वारकरी विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत भव्य वारकरी दिंडी, टाळ, वीणा, मृदंग, विठू नामाच्या गजरात लेकीचे आगळे वेगळे स्वागत केले. कन्या राहीचा विठ्ठल रुख्मिणी मातेच्या चरणाला पदस्पर्श करण्यात आला तदनंतर माऊली वारकरी गुरुकल आश्रमाचे संस्थापक अध्यक्ष अनाथांची माऊली रामेश्वर महाराज पवार यांच्या वतीने मंत्रोच्चार करत लेकीच्या जन्माचे स्वागत करण्यात आले.यावेळी अनाथांची माऊली रामेश्वर महाराज पवार, संस्थेच्या सदस्या शारदा पवार, गणेशराव पवार, संदिप महाराज काकडे, शरद काकडे,गजानन महाराज डीगावकर, पुरूषोत्तम महाराज पवार,अकील भाई शेख, अनिता जैवाळ, शिक्षक सुजाता बिऱ्हाडे,ममता माहोर, तृप्ती राजगूरे, रत्नाकर निकाळजे, परमेश्वर बडक, योगेश परचुरे, सागर जैवाळ, रवींद्र बडक,विजय जाधव, मोटे, समाधान काकडे अशोक मोरे,अमृता पवार,दत्तू इंगळे,सोपान साबळे, सागर तेलंग्रे आदींसह मोठ्या प्रमाणात संस्थेचे विद्यार्थी उपस्थीत होते. तसेच ते राहत असलेल्या घरी देखील उमा गोराडे,अवनी गोराडे,बंडू गोराडे यांच्या वतीने राहीचे स्वागत करण्यात आले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com